उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON
(NAAC ACCREDITED"***")
P.B.NO. 80, UMAVI NAGAR, JALGAON – 425 001 (M.S.)
PHONE: (0257) [illegible]
Fax No.: (0257) 2258403/406
Gram: "UTTAMVIDYA"
Web Site: www.nmu.ac.in
E-mail: bcud_nmu@hotmail.com

जा.क्र. उमवि/5/नवीन विषय.नै.वि.तु.वि.मान्यता-2008.09/517 /2008 दिनांक: 28/07/2008

प्रति,

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत
महाविद्यालयाचे मा.प्राचार्य तसेच
मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक...

विषय:- शैक्षणिक वर्ष 2008-2009 पासून शासनाने मान्य केलेले नवीन विषय/अभ्यासक्रम/विद्याशाखा/ अतिरिक्त तुकडी/नैसर्गिक विस्तार यासंदर्भातील विद्यापीठाच्या संलग्नतेबाबत......

संदर्भ:-1) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक एनजीसी 2008/(215/08)/मशि-3, दिनांक 19 जून, 2008.

2) मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगांव यांचेकडील जा.क्र.अनु-5/नै.वि/द्वि व तृ वर्ष/2008-09/ 1699-1702, दिनांक 19.06.2008.

महोदय,

शासनाने उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयानुसार काही संलग्नीत महाविद्यालयांना/परिसंस्थांना नवीन विषय/अभ्यासक्रम/विद्याशाखा/अतिरिक्त तुकडी तसेच नैसर्गिक विस्ताराच्या विषयांना मान्यता प्रदान केली होती. त्याअनुषंगाने प्राप्त आदेशान्वये महाविद्यालयांच्या/परिसंस्थांच्या विस्तारासंदर्भात तसेच नैसर्गिक विस्तारासंदर्भात तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी विद्यापीठाव्दारा स्थानिक चौकशी समितीची नियुक्ती करण्यांत आली होती. स्थानिक चौकशी समित्यांनी त्या-त्या संबंधित महाविद्यालयांना/परिसंस्थांना भेटी देवून विद्यापीठास अहवाल सादर केलेले असून मा.कुलगुरु महोदयांनी सदरच्या अहवालांस महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, 1994 चे कलम 14(7) अन्वये मा.विद्या परिषदेच्या वतीने मान्यता प्रदान केलेली आहे.

तरी यासंदर्भात मला प्राप्त झालेल्या आदेशावरुन आपणांस कळविण्यात येते की, स्थानिक चौकशी समितीच्या अहवालात नमूद केलेल्या त्रुटी/त्रुटींची तीन महिन्यांच्या आंत पूर्तता करण्याच्या अधीन राहून, महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, 1994 चे कलम 83 (4) नुसार आपल्या महाविद्यालयासमोर/परिसंस्थेसमोर नमूद करण्यात आलेल्या अभ्यासक्रम/विषयांना **शैक्षणिक वर्ष 2008-2009 या एका वर्षाकरिता विद्यापीठाची प्रथम संलग्नता मान्य करण्यांत येत आहे.** महाविद्यालयांनी/ परिसंस्थांनी दरवर्षी संलग्नतेचे नुतनीकरण करुन घेणे आवश्यक राहील.

संलग्नता प्राप्त झालेल्या अभ्यासक्रमांची/विषयांची तसेच स्थानिक चौकशी समितीने त्यांच्या अहवालात नमूद केलेल्या त्रुटी/त्रुटींच्या संदर्भातील सविस्तर माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर Circular या Link मध्ये उपलब्ध असून सदर माहिती ही 15 नोव्हेंबर, 2008 पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध असणार आहे. संबंधित महाविद्यालयांच्या/परिसंस्थांच्या नवीन विषय/अभ्यासक्रम/विद्याशाखा/अतिरिक्त तुकडी तसेच नैसर्गिक विस्ताराच्या विषयांना दिलेल्या मान्यतेबाबतचा सही शिक्क्याचा तक्ता संलग्नता विभागात उपलब्ध असून महाविद्यालयांचे/परिसंस्थांचे प्रतिनिधी विद्यापीठ कार्यालयात इतर कामानिमित्त येतील त्यावेळेस त्यांचेकडे संबंधित तक्ता सुपूर्त करण्यात येईल.

कळावे,

आपला विश्वासू,

(भ.भा.पाटील)
सहा.कुलसचिव (संलग्नता)

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी:-

1.मा.अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-32.
2.मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,पुणे 1.
3.मा.शिक्षण संचालक (तंत्र शिक्षण), तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, 3, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र.1967, मुंबई-1.
4.मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, आकाशवाणी केंद्राच्या शेजारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण इमारत पहिला मजला, जळगांव.
5.मा.सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, नवीन शासकीय तंत्रनिकेतन परिसर, पो.बॉ.नं.219, सामनगांवरोड, नाशिकरोड, नाशिक.
6.मा.परीक्षा नियंत्रक, उमवि, जळगाव.
7.मा.प्रणाली विश्लेषक,संगणक विभाग,उमवि,जळगांव.

विद्यापीठ उमवि/5/नवीन विषय नै वि तु वि मान्यता- 2008 ... व अनुपालिक ...

28 JUL 2008

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

शैक्षणिक वर्ष 2008-2009 पासून विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालय/परिसंस्थांमध्ये शासनाने मान्य केल्यानुसार नवीन विषय/अभ्यासक्रम/अतिरिक्त तुकडी यांच्या विस्तारास तसेच नैसर्गिक विस्तारास मान्य करण्यांत आलेल्या प्रथम संलग्नतेचा तक्ता.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | शासनाने मान्यता प्रदान केलेल्या अभ्यासक्रमाचे विषय | विद्यापीठाने मान्य केलेली विद्यार्थी संख्या | नियुक्त केलेल्या स्थानिक चौकशी समितीच्या अहवालात नमूद केलेल्या अटी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 14 | आदिवासी सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळाचे महाराज ज. पो. वळवी कला महाविद्यालय, धडगाव जि. नंदुरबार. | विज्ञान विद्याशाखा:- भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, भुगोल, संगणकशास्त्र | 30 विद्यार्थी (फक्त संगणकशास्त्राकरिता) | निरीक्षणे :-<br>1)विज्ञान विद्याशाखेसाठी विद्यार्थी संख्या उपलब्ध होऊ शकते.<br>2) महाविद्यालयाच्या नविन इमारतीसाठी संस्थेने जागा खरेदी केलेली आहे.<br>3) आदिवासी दुर्गम भागात शैक्षणिक प्रसारासाठी संस्थाचालकाची तळमळ दिसून आली.<br>4) सध्या स्थितीत ग्रंथालयात विज्ञान शाखेची पुस्तके उपलब्ध नाहीत.<br>5) विज्ञान शाखेच्या सर्व विषयासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा उपलब्ध नाहीत.<br>अटी:-<br>1)हिंदी विषयासाठी तसेच सर्व विज्ञान विद्याशाखेच्या विषयासाठी अर्हताधारक प्राध्यापकाची त्वरीत नेमणूक करण्यात यावी.<br>2) प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र व उपकरणांनी सुसज्ज अशी प्रयोगशाळा विकसीत करावी.<br>3) ग्रंथालयात सर्व विज्ञान शाखेच्या विषयाची व हिंदी विषयाची आवश्यक ती क्रमिक पुस्तके व संदर्भग्रंथ खरेदी करावीत.<br>4) वरील अटींपैकी कोणत्या अटीची किती प्रमाणात पुर्तता केली तसा अहवाल दोन महिन्याचा आत विद्यापीठाकडे सादर करावा. | |
| | | प्रथम वर्ष कला- प्रयोजनमुलक हिंदी | | | |
| | | द्वितीय वर्ष कला - हिंदी (विशेष) | | | |

(भ.भा.पाटील)
सहा.कुलसचिव (संलग्नता)

दिनांक:- 28/07/2008

E:\GOHIL 2009-2010\Navin Shashan Manyata 2008-2009\Manyata to Extn.,Nat.Groth.,Divn.,Intake etc 2008-09.doc